तातडीचे/कालमर्यादा

क्र : वि.उ.आ.(अपिले)/एकत्रिकरण/पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.२९/ब-२६ दिनांक: २८/३/२००७.

विक्रीकर मुख्यालय, /पुनर्रचना कक्ष
८/८३०, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई -१०.

## कार्यालयीन आदेश

**विषय :- अपिल कार्यभारांचे एकत्रिकरण/निर्मिती -**
**सह आयुक्त व उप आयुक्त (अपिले)**

१. विक्रीकर खात्यांतर्गत सध्या कार्यरत असलेल्या विक्रीकर सह आयुक्त (अपिले) व विक्रीकर उप आयुक्त (अपिले) यांच्याकडील प्रलंबीत अपिल प्रकरणांचा आढावा घेतल्यानंतर आणि मुल्यवर्धीत कर प्रणाली अंतर्गत अपिलांची अपेक्षित कमी संख्या विचारात घेवून, तसेच विक्रीकर खात्याच्या पुनर्रचनेचा, शासनाने दि. ५ जानेवारी २००७ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली पदे विचारात घेवून, सध्याच्या अपिले कार्यभाराचे (पदांचे नव्हे) खालीलप्रमाणे, पुनर्रचनेशी अनुरुप एकत्रिकरण करण्यांत येत आहे.

२. **सह आयुक्त (अपिले)** - सध्याच्या सह आयुक्त (अपिले) यांच्या ५ कार्यभारात इतर १० कार्यभार एकत्रिकरणाने खालीलप्रमाणे जोडण्यात येत आहेत. याशिवाय सह आयुक्त (अपिले) मुंबई, नाशिक, नागपूर व औरंगाबाद हे कार्यभार कायम राहतील.

| अ. क्र. | यापुढे कायम रहाणारे सह आयुक्त (अपिल) कार्यभार | स्तंभ १ मधील कार्यभारास एकत्रिकरणाने जोडलेले/ जोडावयाचे कार्यभार | पुनर्रचनेनंतरचे स्तंभ २ मधील कार्यभारांचे नवीन पदनाम |
|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४. |
| १. | सह आयुक्त, (अपिले) १, मुंबई | सह आयुक्त (अपिले)४ आणि १२, | सह आयुक्त, (अपिले) १, मुंबई |
| २. | सह आयुक्त, (अपिले) २, मुंबई | सह आयुक्त, (अपिले) ७, ९ आणि ११ | सह आयुक्त, (अपिले) २, मुंबई |
| ३. | सह आयुक्त, (अपिले) ३, मुंबई | सह आयुक्त, (अपिले) ६ आणि १४ | सह आयुक्त, (अपिले) ३, मुंबई |
| ४. | सह आयुक्त, (अपिले), मुंबई | ---- | सह आयुक्त, (अपिले) ४, मुंबई |
| ५. | सह आयुक्त, (अपिले) ८, ठाणे | सह आयुक्त (अपिले) ५ आणि १३ | सह आयुक्त, (अपिले), ठाणे |
| ६. | सह आयुक्त, (अपिले) पुणे - १ | सह आयुक्त (अपिले) पुणे - २ | सह आयुक्त, (अपिले), पुणे |
| ७. | सह आयुक्त, (अपिले), नाशिक | ---- | सह आयुक्त, (अपिले), नाशिक |
| ८. | सह आयुक्त, (अपिले), नागपूर | --- | सह आयुक्त, (अपिले), नागपूर |
| ९. | सह आयुक्त, (अपिले), औरंगाबाद | --- | सह आयुक्त, (अपिले), औरंगाबाद |

३. वरील प्रमाणे स्तंभ ३ मधील अपिल कार्यभार हे स्तंभ २ मधील कार्यभारांशी एकत्रित केल्यामुळे, यापुढे, दि. १.४.२००७ नंतर स्तंभ ३ मधील कार्यभार शिल्लक राहणार नाहीत. म्हणजेच, फक्त स्तंभ ४ मधीलच सह आयुक्त (अपिले) कार्यभार कायम राहतील.

४. संबंधित क्षेत्रीय अपर विक्रीकर आयुक्तांनी याबाबतची पुढील कार्यवाही तातडीने दि. ७/४/२००७ पूर्वी पूर्ण करावी व आवश्यकतेनुसार औपचारीक आदेश काढावेत. तसेच कार्यभारांच्या एकत्रिकरणाबाबत व यापुढे संबंधित प्रकरणे कोणत्या कार्यभारातून हाताळली जाणार आहेत त्या कार्यभारांचा क्रमांक व कार्यालयीन जागेबाबत, अपिल

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

कर्त्यांना वेळीच कळवावे. तसेच, ज्यांचे आदेशावर सह आयुक्त (अपिले) यांच्याकडे अपिल दाखल केले जाते त्या सर्व अधिका-यांनीही वरील बदलांची नोंद घेवून त्याप्रमाणे त्यांचेकडून पारीत होणा-या आदेशात नेमक्या अपिल प्राधिका-याचा उल्लेख करावा.

**५. उप आयुक्त (अपिले) -**

**कार्यभारांचे एकत्रिकरण, कायम ठेवावयाचे कार्यभार आणि नविन कार्यभारांची निर्मिती.-** सध्याच्या २७ विक्रीकर उप आयुक्त (अपिले) कार्यभारांपैकी ११ कार्यभारांचे (पदांचे नव्हे) खालीलप्रमाणे ८ कार्यभारामध्ये एकत्रिकरण करण्यात येत आहे. तसेच नवीन विभागीय कार्यालय निर्मितीमुळे, पालघर, धुळे व नांदेड या तीन ठिकाणी अपिल उपायुक्तांचे नवीन कार्यभार निर्माण करण्यात येत आहेत. तसेच विक्रीकर उपआयुक्त (अपिले)
प-३१, प-३२, . प-३३, प-४१, प-३६, प-४६, प-५१ व प-५३ हे कार्यभार कायम राहतील.

| अ. क्र | कार्यालयाचे ठिकाण | कायम राहणारा विक्रीकर उप आयुक्त, (अपिले) कार्यभार | स्तंभ ३ मधील कार्यभारास एकत्रीकरणाने जोडावयाचे कार्यभार | पुनर्रचनेनंतरचे स्तंभ -३ मधील कार्यभारांचे नवीन पदनाम | कार्यक्षेत्र - एकत्रिकृत (प्रशा.) विभाग | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५ | ६. | ७. |
| १. | माझगांव | विउआ(अपिले) **प-१** | विउआ(अपिले) **प-७** विउआ(अपिले) **प-१६** | विउआ(अपिले) १, मुंबई . | नरिमन पॉईंट | सहआयुक्त, एकत्रिकृत नरीमन पॉईंट विभाग |
| २. | माझगांव | विउआ(अपिले) **प-२** | विउआ(अपिले) **प-८** विउआ(अपिले) **प-९** | विउआ(अपिले) २, मुंबई . | नरिमन पॉईंट | सहआयुक्त, एकत्रिकृत नरीमन पॉईंट विभाग |
| ३. | माझगांव | विउआ(अपिले) **प-३** | विउआ(अपिले) **प-४** | विउआ(अपिले) ३, मुंबई . | वरळी | सहआयुक्त, एकत्रिकृत वरळी विभाग |
| ४. | माझगांव | विउआ(अपिले) **प-५** | विउआ(अपिले) **प-६** | विउआ(अपिले) ४, मुंबई . | जुनी व व्हॅट मधील अपिले | अपर विक्रीकर आयुक्त (निरीक्षण) |
| ५. | वांद्रे | विउआ(अपिले) **प-१२** | विउआ(अपिले) **प-१०** विउआ(अपिले) **प-११** | विउआ(अपिले) ५, मुंबई | अंधेरी | सहआयुक्त, एकत्रिकृत अंधेरी विभाग |
| ६. | वांद्रे | विउआ(अपिले) **प-१३** | विउआ(अपिले) **प-१७** | विउआ(अपिले) ६, मुंबई | बोरीवली | सहआयुक्त, बोरीवली विभाग |
| ७. | कोकणभवन | विउआ(अपिले) **प-१४** | विउआ(अपिले) **प-१५** | विउआ(अपिले) कोकणभवन. | जुनी व व्हॅट मधील अपिले रायगड विभाग | सहआयुक्त, रायगड विभाग |
| ८. | ठाणे. | विउआ(अपिले) **प-२६** | विउआ(अपिले) **प-२७** | विउआ(अपिले) ठाणे. | जुनी व व्हॅट मधील अपिले ठाणे शहर विभाग | सहआयुक्त, ठाणे शहर विभाग |
| अ. | कार्यालयाचे ठिकाण | कायम राहणारा विक्रीकर उप | स्तंभ ३ मधील कार्यभारास | पुनर्रचने अंतर्गत स्तंभ -३ मधील | कार्यक्षेत्र - | पर्यवेक्षीय |

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

| क्र | | आयुक्त, (अपिले) कार्यभार | एकत्रीकरणाने जोडावयाचे कार्यभार | कार्यभारांचे नवीन पदनाम | एकत्रिकृत (प्रशा.) विभाग | अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५ | ६. | ७. |
| ९. | पालघर. | **<u>नवीन कार्यभार</u>** | - | विउआ(अपिले) ठाणे ग्रामीण (पालघर) | जुनी व व्हॅट मधील अपिले ठाणे ग्रामिण विभाग | सहआयुक्त, ठाणे ग्रामिण (पालघर) विभाग |
| १० . | पुणे. | विउआ(अपिले) प-३१ | - | विउआ(अपिले) १, पुणे. | जुनी व व्हॅट मधील अपिले पुणे विभाग | सहआयुक्त, पुणे विभाग |
| ११ | पुणे | विउआ(अपिले) प-३२ | - | विउआ(अपिले) २, पुणे. | जुनी व व्हॅट मधील अपिले पुणे विभाग | सहआयुक्त, पुणे विभाग |
| १२ | सोलापूर. | विउआ(अपिले) प-३३ | - | विउआ(अपिले), सोलापूर. | जुनी व व्हॅट मधील अपिले सोलापूर विभाग | सहआयुक्त, सोलापूर विभाग |
| १३ | कोल्हापूर. | विउआ(अपिले) प-४१ | - | विउआ(अपिले), कोल्हापूर. | जुनी व व्हॅट मधील अपिले कोल्हापूर विभाग | सहआयुक्त, कोल्हापूर विभाग |
| १४ | नाशिक. | विउआ(अपिले) प-३६ | - | विउआ(अपिले), नाशिक. | जुनी व व्हॅट मधील अपिले नाशिक विभाग | सहआयुक्त, नाशिक विभाग |
| १५ | धुळे . | **<u>नवीन कार्यभार</u>** | - | विउआ(अपिले), धुळे. | जुनी व व्हॅट मधील अपिले धुळे विभाग | सहआयुक्त, धुळे विभाग |
| १६ | जालना/ औरंगाबाद. | विउआ(अपिले) प-४६ | - | विउआ(अपिले), औरंगाबाद. | जुनी व व्हॅट मधील अपिले औरंगाबाद विभाग | सहआयुक्त, औरंगाबाद विभाग |
| १७ | नांदेड. | **<u>नवीन कार्यभार</u>** | - | विउआ(अपिले), नांदेड. | जुनी व व्हॅट मधील अपिले नांदेड विभाग | सहआयुक्त, नांदेड विभाग |
| १८ | नागपूर. | विउआ(अपिले) प-५१ | - | विउआ(अपिले), नागपूर. | जुनी व व्हॅट मधील अपिले नागपूर विभाग | सहआयुक्त, नागपूर विभाग |
| १९ | अमरावती. | विउआ(अपिले) प-५३ | - | विउआ(अपिले), अमरावती. | जुनी व व्हॅट मधील अपिले अमरावती विभाग | सहआयुक्त, अमरावती विभाग |
| | एकूण | १९ | ११ | १९ | - | - |

६. <u>वरीलप्रमाणे स्तंभ-४ मधील अपिल कार्यभार</u> हे स्तंभ-३ मधील कार्यभारांमध्ये एकत्रीत केल्यामुळे, <u>दि. ७/४/०७ पासुन, स्तंभ-४ मधील कार्यभार शिल्लक राहणार नाहीत.</u> म्हणजेच स्तंभ-३ मधीलच विक्रीकर उपआयुक्त (अपिले) कार्यभार कायम राहतील. पुनर्रचने अंतर्गत स्तंभ-३ मधील कार्यभारांचे नवीन पदनाम स्तंभ-५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल. वरील प्रमाणे <u>उप आयुक्त (अपिले) कार्यभार एकत्रीकरणाची कार्यवाही सध्याच्या पर्यवेक्षकीय सह आयुक्त (प्रशासन) यांनी तातडीने दि.७/४/२००७ पर्यंत पूर्ण करुन पूर्तता अहवाल दि. १०/४/२००७ पर्यंत</u> मुख्यालयातील पुनर्रचना कक्षाकडे पाठवावा.

७. सध्याच्या विक्रीकर उपआयुक्त (अपिले) प-२६ मध्ये विक्रीकर उपआयुक्त (अपिले) प-२७ चे एकत्रीकरण होवून विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ठाणे या कार्यभारांची निर्मिती होत आहे. तसेच नवीन विभागीय कार्यालय

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

निर्मितीमुळे पालघर येथे विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ठाणे ग्रामीण (पालघर) हा नवीन कार्यभार निर्माण होत आहे. विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ठाणे ग्रामीण (पालघर) हे पद प्रत्यक्षात भरल्यानंतर, विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ठाणे या कार्यभारातील ठाणे ग्रामीण (पालघर) विभागाच्या कार्यक्षेत्रातील प्रलंबीत अपिल प्रकरणे (जुनी सुध्दा) नव निर्मित कार्यभाराकडे स्थानांतरित करावयाची आहेत.

८ विक्रीकर उप आयुक्त (अपिले) प-४६ हा कार्यभार सध्याच्या औरंगाबाद विभागाच्या मोठया विस्तारामुळे विक्रीकर कार्यालय, जालना येथे कार्यरत आहे. तसेच नवीन विभागीय कार्यालय निर्मितीमुळे नांदेड येथे विक्रीकर उप आयुक्त (अपिले), नांदेड हा नवीन कार्यभार निर्माण होत आहे. विक्रीकर उप आयुक्त (अपिले) नांदेड हे पद प्रत्यक्षात भरल्यानंतर विक्रीकर उप आयुक्त (अपिले) प-४६ या कार्याभारातील, नांदेड विभागाच्या कार्यक्षेत्रातील प्रलंबीत अपिल प्रकरणे (जुनी सुध्दा) नव निर्मित कार्यभाराकडे स्थानांतरीत करावयाची आहेत व विक्रीकर उपआयुक्त (अपिले)प-४६ /विक्रीकर उपआयुक्त (अपिले), औरंगाबाद यांचे कार्यालय, जालना येथून औरंगाबाद येथे स्थलांतरित करण्यात यावे.

९. धुळे या नविन विभागीय कार्यालय निर्मितीमुळे विक्रीकर उपआयुक्त (अपिले) धुळे हा नवीन कार्यभार निर्माण करण्यात येत आहे. हे पद प्रत्यक्ष भरल्यानंतर विक्रीकर उप आयुक्त (अपिले)प-३६ यांच्या कार्यभारातील, धुळे विभागाच्या कार्यक्षेत्रातील प्रलंबित अपिल प्रकरणे (जुनी सुध्दा) नवनिर्मित विक्रीकर उपआयुक्त (अपिले)धुळे य कार्यभाराकडे स्थानांतरीत करावीत.

१०. **कार्यभार एकत्रिकरण करतांना घेण्याची दक्षता** : अपिल कार्यभारांचे एकत्रिकरण करतांना इतर बाबींबरोबरच प्रामुख्याने खालील नोंदवहयांमधील नोंदी अद्ययावत करुन, त्यांचे गोषवारे काढून व शेवटी त्याविषयी प्रमाणित करुन, कार्यभार देणा-या व घेणा-या अधिका-यांच्या स्वाक्षरीसह, सर्व नोंदवहयांचे हस्तांतरण करावे.

| अ.क्र. | नोंदवहीचा क्रमांक | नोंदवहीचे नांव |
|---|---|---|
| १. | २३ | अपिल अर्ज नोंदवही |
| २. | ३ | दैनंदिनी अर्ज नोंदवही |
| ३. | २७ | अपिल आदेश नोंदवही |
| ४. | ५ | अनौ.संदर्भ नोंदवही |
| ५. | १८ | सुधारीत आदेश नोंदवही |
| ६. | ५६ | स्थगिती आदेश नोंदवही |
| ७. | १९ | धारिणी हालचाल नोंदवही |
| ८. | २१ | पुर्न:स्थापना नोंदवही |
| ९. | ८ | लेखा परिक्षण नोंदवही |
| १०. | १९ | धारिण्या अभिलेख शाखेकडे सादर केल्याची नोंदवही |
| ११. | | प्रलंबित अपिले नोंदवही |
| १२. | | आवक जावक नोदवही |

११. नोंदवहयातील नोंदी अद्ययावत केल्यानंतर त्या आधारे सर्व प्रलंबित जिवीत अपिल प्रकरणांची, तसेच निकालात काढलेल्या अपिल प्रकरणांची यादी, धारिण्यांसह, मोजणी करुन, त्या ताब्यात दयाव्यात/घ्याव्यात. कार्यभार प्रमाणपत्रामध्ये त्याचा स्पष्ट उल्लेख करावा. ताब्यात दिलेल्या/घेतलेल्या नोंदवहया व धारिण्यांची यादी ५ प्रतीत तयार करुन कार्यभार देणा-या व घेणा-या अधिका-यांनी प्रत्येकी १ प्रत स्वत:कडे ठेवावी, १ प्रत प्रशासन सह आयुक्तांना द्यावी व १ प्रत पुनर्रचना कक्षाकडे पाठवावी.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com

१२.   संबंधीत विक्रीकर सहआयुक्तांनी (नविन विभागांचे बाबतीत सध्याचे प्रशासन सह आयुक्तांनी) याबाबतची पुढील कार्यवाही तातडीने दि. ७/४/२००७ पूर्वी पूर्ण करावी व पूर्तता अहवाल दि. १०.४.२००७ पर्यंत पुनर्रचना कक्षास पाठवावा. तसेच, कार्यभारांच्या एकत्रीकरणाबाबत व यापुढे संबंधीत प्रकरणे कोणत्या कार्यभारातून हाताळली जाणार आहेत त्या कार्यभाराचा क्रमांक व कार्यालयीन जागेबाबत, संबंधीत व्यापा-यांना वेळीच कळवावे. तसेच ज्यांचे आदेशावर उप आयुक्त (अपिले) यांच्याकडे अपिल दाखल केले जाते त्या सर्व अधिका-यांनीही वरील बदलांची नोंद घेवून त्याप्रमाणे त्यांचेकडून पारीत होणा-या आदेशात, नेमक्या अपिल प्राधिका-याचा उल्लेख करण्याबाबत कळवावे.

**(वि.ना.मोरे)**
**अपर विक्रीकर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रती :-**

१.सर्व अपर विक्रीकर आयुक्त.
२.सर्व सह आयुक्त, (अपिले)
३.सर्व सह आयुक्त,(प्रशासन)
४.सर्व सह आयुक्त, (अंमलबजावणी)
५. सर्व उप आयुक्त (अपिले)
६.उपआयुक्त (प्रशासन)४, आयुक्त कार्यालय, मुंबई.
७.सहाय्यक आयुक्त (प्रशासन) ८, आयुक्त कार्यालय, मुंबई.
८.विक्रीकर मुख्यालयातील सर्व कार्यासने.
९.कार्यासन - आस्था-२/आस्था-३/आस्था-४(उपलब्ध होणारे मनुष्य बळ इतरत्र देण्यासाठी)
१०. सहआयुक्त मुख्यालय-१/ मुख्यालय-२(वैधानिक आदेश/अधिसूचना संबंधाने)

**प्रत सादर :-**

१.मा.विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२.मा.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

PDF Created with deskPDF PDF Writer - Trial :: http://www.docudesk.com